# <u>प्रेसनोट</u>

## <u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 67/2022 दिनांक : 17.02.2022</u>

## 1)जबरी चोरी :—

**बारड :—**दिनांक 15.02.2022 रोजी चे पहाटे 01.00 वा. चे सुमारास, **देगाव येथील हनुमान मंदीराचे लगत डी.पी. जवळ बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचा मेव्हणा असे त्यांची स्विप्ट डिझायर कार लघुशंका करण्यासाठी थांबवली असता. नांदेडहुन दोन मोटार सायकल वर चार अनोळखी इसम फिर्यादीचे कार जवळ येवून फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन नगदी रुपये व दोन मोबाईल किंमती 30000/—रू चा माल बळ जबरीने चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी राजेंद्र दत्तात्रय शिंदे, वय 38 वर्षे, व्यवसाय मंडळ अधिकारी रा. तिरुमला पार्क मामा चौक कौठा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं 16/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री वानोळे**, **मो.क्रं. 9822179877** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**किनवट :—**दिनांक 15.02.2022 रोजी चे रात्री 08.30 वा. ते दिनांक 16.02.2022 चे सकाळी 08.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी नारायण नगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे कुटूंब हे कामानिमित्त बाहेरगावी गेल्याने घरात कोणीही नसताना अज्ञात आरोपीने घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करुन कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व नगदी असा एकुण किंमती 63815/—रू चा माल चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी माणिक हनुमंत मोहिते, वय 53 वर्षे, व्यवसाय वनरक्षक रा. खरबी ता. उमरखेड जि. यवतमाळ ह.मु. नारायण नगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 29/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1913 राठोड**, **मो.क्रं. 9552888455** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 28.01.2022 रोजी चे 17.30 ते 17.45 वा. चे दरम्यान, **साईचरण सिटी असदवन, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा कंपनीची पॅशन प्रो. मो.सा. क्र. एमएच—26/एक्स—4305 किंमती 7,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी दिनेश कृष्णा जैनपल्ले, वय 32 वर्षे, व्यवसाय सी.सी.टी.व्ही. टेक्नीशियन रा. कलामंदीर बसस्थानक, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 88/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1882 शेख जावेद, मो.क्र. 8999978576** हे करीत आहेत.

## 4)जनावर चोरी :—

**सोनखेड :—**दिनांक 14.02.2022 रोजी चे 20.00 चे सुमारास, **फिर्यादीचे शेतातील आखाडयावर भेंडेगाव शिवार ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची एक म्हैश अंदाजे किंमती 50,000/—रुपयाची कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शिवाजी शेषराव कदम, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. भेंडेगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 21/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1939 हंबर्डे**, **मो. क्र. 9158868002** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**1)नांदेड ग्रामीण :—**दिनांक 16.02.2022 रोजी चे 06.00 वा. चे सुमारास, **कांकाडी ता.जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस व फिर्यादीचे पत्नीला प्लॉट व शेतीच्या कारणावरुन हातातील दगडाने फिर्यादीच्या तोंडावर मारुन वरचा एक दात पाडला, लाथाबुक्याने मारहाण व शिवीगाळ करुन दुखापत केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी प्रल्हाद साहेबराव सगर, वय 45 वर्षे व्यवसाय शेती रा. कांकाडी ता.जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 90/2022 कलम 325,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1884 मुपडे, मो. नं. 8421435353** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :—**दिनांक 12.02.2022 रोजी चे 18.00 वा. ते 18.30 वा. चे दरम्यान, **भिमराव पोशटी मुंडलोड यांचे घराचे भिंतीस लागुन जारीकोट ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तु कशी काय दारु पिऊ देत नाहिस म्हणुन फिर्यादीस लोखंडी खुर्चीने हातावर मारल्याने हात फॅक्चर झाला, फिर्यादीचे पत्नीला व मुलास लाथाबुक्याने मारहाण केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण संभाजी मुंडलोड वय 48 वर्षे व्यवसाय मजुरी रा. जारीकोट ता. धर्माबाद जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 38/2022 कलम 325,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1688 आडे, मो. नं. 9923692588** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :—

**उस्माननगर :—** सन 2017 ते आत पावेतो, **फिर्यादीचे सासरी व माहेरी रेणकापुर ता. वसमत जि. परभणी व ह.मु. नंदनवन ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद तिन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तु तुझ्या माहेरहुन प्लॉट विकत घेण्यासाठी दहा लाख रुपये घेवून ये असे म्हणुन फिर्यादीस उपाशी पोटी ठेवून मारहाण करुन तीचा शारिरीक व मानसीक छळ केला, शिवीगाळ केली. वगैरे **फिर्यादी** 25 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 24/2022 कलम 498(अ),323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2536 व्ही.बी. राठोड**, **मो.क्रं. 9945689777** हे करीत आहेत.

## 7)आत्महत्येस प्रवृत केले :—

**भाग्यनगर :—**दिनांक 15.02.2022 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **राजेशनगर तरोडा नाका**, **नांदेड येथे,** यातील **मयत नामे संदीपान रामकिशन खंदारे, वय 37** वर्षे, **रा. राजेशनगर, नांदेड**, यास यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन मयत यास किरकोळ कारणावरुन मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवून मयताचे मरणास कारणीभुत झाले. वगैरे **फिर्यादी रंजना अमोल यादव, वय 40 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. धामनेर ता. कोरेगाव जि. सातारा ह.मु. विसावा नाका गणेश पार्क, सातारा जि. सातारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 55/2022 कलम 306,323,504,,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मुंडे मो.नं. 8329806013** हे करीत आहेत.

## 8)खंडणी :—

**भाग्यनगर :—**दि. 15.02.2022 रोजी चे 06.30 वा. ते 07.00 वा. दरम्यान, **सहयोगनगर,नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस रिव्हॉलवर दाखवुन एक लाख रुपये खंडणी दे असे म्हणुन अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन थापड बुक्याने मारहाण केली. व्हॉटसअप व फेसबुकवर अश्लिल भाषेत मॅसेज पाठविला. वगैरे **फिर्यादी विशाल रमेशराव सुर्यवंशी वय 41 वर्षे रा. सहयोग नगर,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 57/2022 कलम 384,294,323,506,34 भादवी सह कलम 3/25 भा.ह.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री शेख**, **मो.क्रं. 7875987154** हे करीत आहेत.

## 9)शासकीय आदेशाचे उल्लंघन :—

**1)भाग्यननगर :—** दिनांक 15.02.2022 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, **भाग्यनगर कमान ते आंनदनगर मार्ग सेवालाल महाराज मंदीर हनुमान गढ, नांदेड येथे,** यातील नमुद चार व इतर दहा ते बारा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. जिल्हाधिकारी साहेब, नांदेड यांचे जमावबंदी आदेश व कोवीड 19 साथ रोग संदर्भाने प्रतिबंधाआत्मक उपाय योजनेचे नियमावलीचे आदेश चालु असताना सुध्दा अंतर न बाळगता चेहऱ्यावर मास्क नवापरता श्री सेवालाल महाराज यांची जयंती काढली व आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोना/209 गोविंद माणिकराव मंगनाळे, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 56/2022 कलम 188,269,270 भादवी महाराष्ट्र कोवीड—19 उपाय योजना नियमावली 2020 चे नियम कलम 11 राष्ट्रीय आपत्ती व्यवसस्थान अधिनियम 2005 कलम 51 ब सह 135 म. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना**/51 **जाधव, मो.क्र. 9067952076** हे करीत आहेत.

**2)माहुर :–** दिनांक 15.02.2022 रोजी चे 15.00 वा. ते 19.00 वा. चे दरम्यान, **छत्रपती शिवाजी महाराज चौक माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद 21 आरोपी व इतर 50 ते 60 आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. जिल्हाधिकारी साहेब, नांदेड यांचे जमावबंदी आदेश 37(1)(3) मु.पो. अधिनियम चे उल्लंघन करुन बेकायदेशीर रित्या श्री सेवालाल महाराज यांची जयंती मिरवणुक काढली व कोविड–19 नियमांचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोका/670 गजानन उत्तमराव इंगळे, ने. पोस्टे माहुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 10/2022 कलम 143,188,269,270 भादवी सह 135 म. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/विजय आडे, मो.क्र. 7020105812** हे करीत आहेत.

**3)हदगाव :–** दिनांक 15.02.2022 रोजी चे 13.00 वा. ते 16.00 वा. चे दरम्यान, **रामलीला मैदान ते आंबेडकर चौक सोनुले चौक राठी चौक दत्तबर्डी हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद 4 आरोपी व इतर 75 ते 100 आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. जिल्हाधिकारी साहेब, नांदेड यांचे जमावबंदी आदेश 37(1)(3) मु.पो. अधिनियम चे उल्लंघन करुन बेकायदेशीर रित्या श्री सेवालाल महाराज यांची जयंती मिरवणुक काढली व कोविड–19 नियमांचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोह/2342 विश्वनाथ बालाजी हंबर्डे, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 41/2022 कलम 143,188,269,270 भादवी सह 135 म. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री पांढरे, मो.क्र. 8180011000** हे करीत आहेत.

**4)हदगाव :–** दिनांक 15.02.2022 रोजी चे 12.00 वा. ते 13.30 वा. चे दरम्यान, **सुभाष शुगर कारखाना हडसणी ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद 9 आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. जिल्हाधिकारी साहेब, नांदेड यांचे जमावबंदी आदेश 37(1)(3) मु.पो. अधिनियम चे उल्लंघन करुन बेकायदेशीर रित्या मोर्चा काढुन कोविड–19 नियमांचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री हनुमंत अमृतराव गायकवाड, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 42/2022 कलम 143,188,269,270 भादवी सह 135 म. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्र. 7558864052** हे करीत आहेत.

## 10)जुगार :–

**1)सिंदखेड :–** दिनांक 16.02.2022 रोजी चे 17.50 वा. चे सुमारास, **मौजे वाई बाजार भाजीपाला मार्केट येथे हॉटेल समोर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण क्लोज नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 2050/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/1926 गुंडेराव रघुनाथ करले, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 18/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2471 जी.आर.कुमरे**, **मो.क्र. 7744002471** हे करीत आहेत.

**2)सिंदखेड :–** दिनांक 16.02.2022 रोजी चे 12.10 वा. चे सुमारास, **मौजे सारखणी ते सालाईगुडा जाणारे रस्त्याचे बाजुस एका लिंबाचे झाडाखाली,सिंदखेड ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1390/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/2106 हकिमखान सुलेमानखान पठाण, ने. पोस्टे सिंदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 17/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2106 पठाण**, **मो.क्र. 9309574775** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड